# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक १२/१२/२०१७

## *पोलीस माओवादी चकमकीत ०१ जहाल माओवादी ठार*

दिनांक ०६/१२/२०१७ रोजी कल्लेड जंगल परिसरात पोलीस व माओवादी यांच्यात झालेल्या चकमकीमध्ये पळून गेलेले माओवादी हे उपविभाग जिमलगट्टा अंतर्गत उपपोस्टे देचलीपेठा येथील मौजा कामासुर व येलाराम गावाच्या नजिकच्या जंगल परिसरात लपून बसले आहेत. अशी गोपनिय माहिती प्राप्त झाल्याने पोस्टे देचलीपेठा पोलीस पार्टी तर्फे कामासुर पहाडी जंगल परिसरात नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना आज सकाळी ०९.३० ते १०.०० वा. च्या सुमारास दबा धरुन बसलेल्या माओवादयांनी पोलीसांवर बेछूट गोळीबार केला. आत्मसंरक्षणासाठी व प्रत्युत्तरादाखल पोलीसांनी माओवादयांवर गोळीबार केला. १० ते १५ मिनटे चाललेल्या चकमकीनंतर माओवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत घटनास्थळावरुन पळ काढला.

यानंतर घटनास्थळाचा शोध घेतला असता घटनास्थळावर ०१ पुरुष नक्षल मृतदेह व एक .३०३ रायफल व राऊंड मिळून आले त्याचबरोबर काही दैनंदिन वापराचे नक्षल साहीत्य मिळून आले. या चकमकीमध्ये काही नक्षल जखमी झाल्याची शक्यता आहे त्यामुळे परिसरामध्ये नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.